# जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

## चंद्रपूर जिल्ह्यातील वाळू गटांचे राज्यस्तरीय (SEAC व SEIAA) पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणुक करिता ई-निविदा

वाळू/रेती निर्गती सुधारीत धोरण, 2019 नुसार चंद्रपूर जिल्ह्यातील प्रस्तावीत वाळूगटांना राज्यस्तरीय (SEAC व SEIAA) पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्याकरिता मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) नियुक्त करावयाचे आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील सन 2019-20 ते सन 2023-24 या पाच वर्षाकरिता वाळू गटांच्या राज्यस्तरीय (SEAC व SEIAA) पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी From 1/1 M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेची कार्यवाही https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध् राहील.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | दि. 07/11/2019 | |
| ई-निविदा स्विकारण्याचा दिनांक | दि. 07/11/2019 ते दि. 15/11/2019 | वेळ संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 16/11/2019 | वेळ दुपारी 3.00 वाजता |

<u>अटी व शर्ती</u>

1. ई-निविदा शुल्क रु. 1,000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा करावे लागेल.
2. पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) (Mining of Minerals) या विभागात (Quality Council of India (QCT) किंवा (National Accreditaion Board for Eduction and Training) यांचेकडून मान्यता प्राप्त असणे आवश्यक आहे.
3. वाळू गटांच्या राज्यस्तरीय पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी From 1/1 M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्याचा कमीत-कमी दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
4. महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र.गौखनि-10/0219/प्र.क्र.9/ख-1, दि. 03/09/2019 व केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि. 14 सप्टेंबर, 2006 (EIA Notification), दि. 15/01/2016 व दि. 03/03/2016 च्या तरतूदी लागू राहतील. तसेच Sustainable Sand Mining Guidelines 2016 व Sand Mining Framewaork 2018 आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे पालन करणे बंधनकारक राहील.
5. सदर निविदा चंद्रपूर जिल्ह्यातील सन 2019-20 ते सन 2023-24 या पाच वर्षाकरिता शासन नियमाप्रमाणे निश्चित केलेल्या वाळू गटांकरिता असेल.
6. एका वाळू गटाकरीता सर्वात कमी किंमत ई-निविदा मध्ये प्राप्त होईल ती निविदा अट क्र. 2, 3 व 4 च्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
7. निविदा मान्य झाल्यावर कोणतीही अग्रीम रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.
8. राज्यस्तरीय पर्यावरण (SEAC व SEIAA) अनुमती प्राप्त करुन देणे From 1/1 M, EIA, EMP व Mining Plan केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या दि. 15/01/2016 च्या तरतूदीनुसार व शासन नियमाप्रमाणे रेती गट निश्चित केल्यावर 20 दिवसात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

9. पर्यावरण अनुमती मिळविण्याकरिता वेळोवेळी SEAC व SEIAA ने मागितलेली संपूर्ण माहिती पुरविण्याची जबाबदारी सल्लागाराची राहील. तसेच वाळूगटास राज्यस्तरीय पर्यावरण (SEAC व SEIAA) समितीची मान्यता मिळाल्यावर कंत्राटाची पूर्ण रक्कम अनुज्ञेय राहील.
10. वाळू लिलाव झाल्यावर संबंधीत लिलावधारकाच्या नावे राज्यस्तरीय पर्यावरण अनुमती (SEAC व SEIAA) वर्ग करुन देणे, Mining Plan व इतर आवश्यक तांत्रिक कागदपत्रे संबंधीत लिलावधारकाच्या नावे हस्तांतरण करणे आवश्यक राहील.
11. राज्यस्तरीय पर्यावरण बैठकीस (SEAC व SEIAA) पर्यावरण सल्लागार समवेत mining of minerals प्रवर्गातील in-house expert हजर राहणे आवश्यक राहील व प्रतिनिधी पाठविण्यात येऊ नये व याबाबत कुठलाही वाहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
12. निविदा मान्य झाल्यावर रु. 500/- च्या मुद्रांकनावर करारनामा करणे आवश्यक राहील.
13. अटी व शर्तीचे अनुपालन न केल्यास देय असलेली पूर्ण रक्कम कपात करण्यात येईल अथवा अंशत: कपात करुन रक्कम देण्यात येईल.
14. देय असलेल्या रक्कमेतुन नियमानुसार 2 % आयकर (TDS) कपात करण्यात येईल.
15. कुठलीही पूर्व सुचना न देता कोणत्याही वेळी करार रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना राहील.
16. अटी व शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना राहील.
17. सदर प्रकरणी काही वाद उद्भवल्यास चंद्रपूर न्यायपालिकेच्या अधिकार क्षेत्रात सोडविण्यात येतील.
18. प्रशासकीय कारणास्तव निविदा नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना राहील.
19. शासन धोरण, शासन निर्णय, परिपत्रक, अधिसूचना तसेच मा.न्यायालय व मा.हरीत लवाद यांचे वेळोवेळी होणारे आदेश / बदल पर्यावरण सल्लागारास मान्य करणे व त्यानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.
20. निविदेमध्ये सहभागी होण्यास आवश्यक कागदपत्रे.

अ. तांत्रिक लिफाफा

- i) अट क्र. 2 नुसार मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार असल्याचे प्रमाणपत्र.
- ii) PAN Card
- iii) GST नोंदणी प्रमाणपत्र.
- iv) दोन वर्षे कामाचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.
- v) सदर निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र.

ब. आर्थिक लिफाफा

- i) सदर दर BOQ मध्ये सादर करुन BOQ अपलोड करावा.

11/11/15

अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर

# ई-निविदा सूचना
## जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर

जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांच्याकडून सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (Accredited Environment Consultant) यांना कळविण्यात येते की, चंद्रपूर जिल्ह्यातील सन 2019-20 ते सन 2023-24 या पाच वर्षाकरिता वाळू गटांच्या राज्यस्तरीय (SEAC व SEIAA) पर्यावरण अनुमती मिळविण्यासाठी From 1/1 M, EIA, EMP व Mining Plan तयार करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदरील निविदेची कार्यवाही https://mahatenders.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध राहील.

ई-निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती https://chanda.nic.in व https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध् आहे. ई-निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 15/11/2019 रोजी 5.45 वाजेपर्यंत आहे.

दिनांक :- 07/11/2019

अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर

O/C